"गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन"

भारती विद्यापीठाचे

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली

(शिवाजी विद्यापीठ संलग्न)

गराव कदम
A., LL.B., Ph.D.

जी. कणसे
M.Sc., Ph.D.

पो.बॉक्स नं. ७४, सांगली - ४१६४१६ फोन नं. ०२३३-२५३५२२१, फॅक्स २५३५११३
E-mail : bvpkc_sangli@yahoo.co.in, dgkanase@gmail.com
Website : www.dpkmsangli.bharatividyapeeth.edu

Estd. 1964
Celebrating
and Beyond
BHARATI VIDYAPEETH
Founder Hon'ble Dr. Patangrao Kadam

Accredited with 'B++' Grade
by NAAC (3rd Cycle)

: भावि / पकमसां / ४८१-४ / २०२१ -२०२२

दिनांक २२/१२/२०२१

प्रति,

**मा. डॉ. संजीवनी पाटील,**

कला व वाणिज्य महाविद्यालय,

गडहिंग्लज.

**विषय: शिवाजी विद्यापीठ जिल्हास्तरीय युवा महोत्सवासाठी परीक्षक म्हणून उपस्थित राहिलेबाबत ...**

महोदया,

संस्थापक-कुलपती मा. डॉ. पतंगराव कदमसाहेब यांच्या कल्पनेतून साकारलेले आणि 'गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन' हे ध्येयवाक्य असलेले भारती विद्यापीठ गेली ५७ वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे. जागतिक पातळीवर पोहोचलेल्या या संस्थेने स्थापनेपासून सामाजिक जाणिवेतून शिक्षणबरोबरच कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती, समाजकारण आदी सर्वच क्षेत्रांत थेट सहभागी होऊन सातत्याने भरीव योगदान दिले आहे. याच भारती विद्यापीठाची एक शाखा असलेले, शिवाजी विद्यापीठाशी संलग्न कला, विज्ञान व वाणिज्य अशा तिन्ही विद्याशाखांनी युक्त सांगली शहरातील आपले हे एकमेव महाविद्यालय आहे.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे दरवर्षी जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जपण्याचा प्रयत्न करणारा हा महोत्सव बुधवार दिनांक २२ डिसेंबर २०२१ रोजी भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात संपन्न झाला. या महोत्सवातील वक्तृत्व हिंदी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाने परीक्षक म्हणून आपली नियुक्ती केली होती, त्यानुसार आपण याठिकाणी उपस्थित राहून सदर स्पर्धेचे योग्य मूल्यमापन करून युवा महोत्सव सुरळीत पार पाडण्यास या महाविद्यालयाला व विद्यापीठाला मदत केलीत त्याबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हे महाविद्यालय आपणास मन:पूर्वक धन्यवाद देत आहे.

शिवाजी विद्यापीठाशी व या महाविद्यालयाशी आपला स्नेहबंध आहेच तो अधिक वृद्धींगत व्हावा, ही सदिच्छा।

कळावे.

आपला विश्वासू,

(डॉ. डी. जी. कणसे)
प्राचार्य
भारती विद्यापीठाचे
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली.